# आकाशवाणी पुणे

## प्रादेशिक वृत्त विभाग

## पुणे वृत्तांत

## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक – 13.05.2023** **वार – सोमवार**

---

**<u>मतदान</u>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात आज पुणे जिल्ह्यातील पुणे शहर, शिरुर आणि मावळ लोकसभा मतदार संघात मतदान झालं. या सर्व ठिकाणी सकाळी 7 वाजता मतदानाला सुरुवात झाली.

पुणे लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी आज सकाळी कसबा गणपती आणि तांबडी जोगेश्वरीचे दर्शन घेऊन कुटुंबीयांसमवेत मतदानाचा हक्क बजावला. महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी रविवार पेठेतल्या कमला नेहरू विद्यालयात कुटुंबियांसह मतदान केलं. खासदार डॉक्टर मेधा कुलकर्णी, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, भाजपचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनीही मतदानाचा हक्क बजावला. माजी आमदार उल्हास पवार, मोहन जोशी, अभय छाजेड,रमेश बागवे आदींनी आपल्या कुटुंबियांसह मतदान केलं.

**<u>दिलीप वळसे पाटील</u>**

राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी व्हीलचेअरवर येऊन आपला मतदानाचा हक्क बजावला. आंबेगाव तालुक्यातील निरगुडसर या त्यांच्या गावातील मतदान केंद्रावर शिरूर लोकसभा मतदारसंघासाठी मतदान केले. मतदानानंतर त्यांनी मतदारांना मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन केले. गेली दीड महिने हॉस्पिटल मधुन प्रचार यंत्रणेवर लक्ष ठेऊन योग्य त्या सूचना देत होतो तसंच वेळोवेळी आढावा घेत होतो असं वळसे पाटील म्हणाले.

मावळ लोकसभा मतदारसंघ अंतर्गत असलेल्या मावळ, पिंपरी, चिंचवड, उरण, पनवेल, कर्जत या सहा विधानसभा मतदार संघात यावेळी मतदारांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध संकल्पना राबवण्यात आल्या. सकाळच्या सत्रात जवळपास सर्वच मतदान केंद्रांमध्ये नागरिकांनी मतदानासाठी गर्दी केली होती. मात्र ऊन वाढायला लागलं तसा मतदानाचा टक्काही घसरायला लागला. संध्याकाळी साडेचार नंतर केंद्रांवर पुन्हा रांगा दिसायला लागल्या. सकाळच्या सत्रात मावळ मतदार संघातील जवळपास आठ ईव्हीएम यंत्रणांमध्ये बिघाड झाल्याने काही काळ मतदान थांबवण्यात आले होते. जवळपास अडीच हजार मतदान केंद्रावर प्रत्यकी अडीच हजार अधिकारी, कर्मचारी, पथके नियुक्त करण्यात आले होते.

संवेदनशील मतदान केंद्रावर अतिरिक्त पोलीस फाटा तैनात करण्यात आला होता. पोलीस, निवडणूक, महापालिका प्रशासन यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगासाठी मदतनीस तसंच  व्हीलचेअर आणि रॅम्प यांची व्यवस्था करण्यात आली होती.

**<u>शिरूर</u>**

पुणे जिल्ह्यात बारामती पाठोपाठ लक्षवेधी ठरलेल्या शिरूर लोकसभा मतदार संघात आज उत्साहात मतदान झालं. बहुतांशी ग्रामीण भाग असणाऱ्या या मतदारसंघात सकाळपासून मतदारांत उत्साह दिसून आला. मंचर भागातील काही मतदारसंघात दुपारी एक वाजताच पन्नास टक्क्यांहून अधिक मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. चाकण, शिरोली आणि राजगुरुनगर या भागात दुपारी उन्हात रांगा लागल्या हो त्या,त्यात अगदी नव मतदारांपासून ते 80-90 वय ओलांडलेले ज्येष्ठ नागरिकही सहभागी झाले होते. जुन्नरमध्ये एका मतदान केंद्रावरील सर्व यंत्रणा महिलांनी सांभाळल्या होत्या. काही ठिकाणी मतदान केंद्राबाहेर सेल्फी पॉइंटही उभारण्यात आले होते. दुपारच्या उन्हाच्या वेळेचा अपवाद वगळता एकूणच लोकसभा निवडणुकीचा लोकशाही उत्सव हा लोकांनी उत्साहात साजरा केला.

**<u>कोरोना नवीन उपप्रकार</u>**

कोरोना विषाणूच्या ओमिक्रोन प्रकारातील, के पी 2 हा नवीन उपप्रकार आढळून येत असून, या उपप्रकाराचे राज्यात आतापर्यंत 91 रुग्ण आढळले आहेत. यातील सर्वाधिक 51 पुण्यातील आहेत. हा उपप्रकार सौम्य स्वरूपाचा असून, चिंता करण्यासारखी परिस्थिती नसल्याचं जनुकीय क्रमनिर्धारणाचे राज्य समन्वयक डॉ. राजेश कार्यकर्ते यांनी सांगितलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात गेल्या दोन दिवसात झालेल्या पावसामुळे कमाल तापमानात बरीच घट झाली आहे. आज कमाल तापमान 37 अंश सेल्सिअस तर किमान तापमान 23 पूर्णांक 3 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. संध्याकाळी  मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी 6 वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**